# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 10.01.2013 (का.प.क्र.23) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरूवार दिनांक 10.01.2013 (का.प.क्र.23) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

**01.** स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
**02.** स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
**03.** स. श्री.आगा खान मिया खान
**04.** स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
**05.** स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
**06.** स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
**07.** स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
**08.** स. श्री. खान अक्रम करीम खान
**09.** स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
**10.** स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
**11.** स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री.समीर राजुरकर** **:महानगरपालिकेत पुर्वी 3 ते 6 या वेळात अधिकारी केबिनमध्ये उपस्थित राहत होते. परंतु आता तसे दिसुन येत नाही. माझी मा.आयुक्त व स.पदाधिकारी यांना विनंती आहे की, त्यांनी दूपारच्या 3 ते 6 च्या दरम्यान कोणतीही बैठक घेण्यात येऊ नये. दूपारी 3 ते 6 च्या सत्रात अधिकारी दालनात हजर नसतात त्यामुळे सामान्य नागरीकांचे कामे होत नाही. किमान वरिष्ठ अधिकारी यांनी दूपारी 4 ते 6 त्यांचे दालनात बसले पाहिजे. मा.आयुक्तांनी किमान 4 ते 6 यावेळात बैठक घेण्यात येऊ नये. नागरीकांना छोटया छोटया कामांसाठी अनेक चकरा माराव्या लागतात हे योग्य नाही.**

**श्री.रेणुकादास वैद्य** **:मा.आयुक्त यांना यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. दूपारी 4 ते 6 ही वेळ नागरीकांसाठी राखीव ठेवली गेली पाहिजे. 11 ते 1 च्या दरम्यान प्रशासनाने कामे करावीत. लेखी पत्र देण्यात आलेली आहे परंतु अंमलबजावणी झालेली नाही. मा.आयुक्तांनी यासंबधीची लेखी सूचना सर्व विभाग प्रमुख व अधिकाऱ्यांना देण्यात यावी. स.सदस्यांनी तक्रार केल्यास प्रशासनाने कठोर कारवाई करण्यात यावी. दूपारी अधिकारी हजर असतात म्हणुन येतात व सायंकाळी 6 वाजेपर्यंत नागरीक अधिकाऱ्यांची वाट पाहून परत जातात आणि 6 नंतर अधिकाऱ्याचे वाहने मुख्यालयात येतांना दिसतात तसेच अनेक अधिकाऱ्यांचे कार्यालयीन वेळेमध्ये भ्रमणध्वनी बंद असतात. डायव्हर्ट केलेले असतात तसेच काही जणांनी फॅमिली कोडींग करून ठेवलेले आहे. वैयक्तिक काम सांगण्यात येत नाही. नागरीकांची**

कामे सांगीतले जातात. पत्रामध्ये नमुद करण्यात यावे की, अधिकारी 4 ते 6 वेळात उपलब्ध नसल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :नागरीक कार्यालयात कामासाठी येतात परंतु अधिकारी जागेवर हजर नसल्या कारणाने संचिकेबाबत माहिती प्राप्त होत नाही. नागरीकांना चांगली सेवा देण्यात यावी.

मा.सभापती :महानगरपालिकेचे बजेट हे वर्कवाईझ बजेट आहे. स.सदस्यांना याबाबतीत फॉलोअप करण्याची आवश्यकता नाही. तरीही स.सदस्यांना त्यांचे कामासाठी चकरा माराव्या लागतात. तसेच एखाद्या विभागात एखादी संचिका आल्यास तीन दिवसाच्या आत प्रकरणाचा निकाल लावुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. संचिका दालनात अनेक दिवस तशाच पडुन राहतात. शहर अभियंता यांनी यासंबधी सर्व विभागांना पत्र काढण्यात यावे. संचिकेवर तारीख टाकण्यात यावी. विभागात आलेल्या संचिकेवर तीन दिवसात निर्णय घेऊन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. तसेच अधिकाऱ्यांनी आपला मोबाईल चालु ठेवावा. स.सदस्यांकडे नागरीक काही सूचना तक्रारी घेऊन येतात त्यावेळेस अधिकारी यांना संपर्क करणे आवश्यक असते त्यामुळे अधिकाऱ्यांनी आपले भ्रमणध्वनी चालु ठेवण्यात यावे. सर्व अधिकारी यांनी 4 ते 6 या वेळात महापालिकेच्या कॅम्पसमध्ये उपस्थित राहावे.

श्रीमती सविता घडमोडे :वार्डातील 200 ते 300 घरांना पाणी येत नाही अनेक वेळा सभागृहात प्रश्न मांडलेला आहे परंतु प्रशासनातर्फे काहीही कार्यवाही केली जात नाही. तसेच मॉ साहेब जिजाऊ उद्यान कामाबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा.

श्री.नारायण कुचे :प्रत्येक सभेमध्ये स.सदस्या श्रीमती घडमोडे उद्यानाचा विषयाबाबत चर्चा करत आहे परंतु प्रशासनाकडुन कुठलीही दखल घेतली जात नाही. मॉ जिजाऊ यांची जयंती आहे.

श्री.समीर राजुरकर :संचिका प्रशासनाला सापडत नाही. अनेक वेळा स.सदस्यांनी हा प्रश्न मांडलेला आहे. संचिकेचा निकाल लावण्यात यावा.

कार्य.अभियंता (बीओटी):संचिका पुटअप करण्यात आली होती परंतु बजेट अभावी संचिका परत आली. या आर्थिक वर्षात बजेटमध्ये याकामाची तरतुद करण्यात येईल. तीन दिवसांत तात्काळ प्रकरण मार्गी लावण्यात येईल.

मा.सभापती :बजेटमध्ये समावेश करण्यासाठी प्रशासनाने लेखी कळविण्यात यावे मागील मिटींगमधील सदरील प्रकरण प्रलंबीत आहे प्रशासनाने तात्काळ प्रकरण मार्गी लावावे.

श्री.विजेंद्र जाधव :7 समुह संघटक यांच्या मुदतवाढीबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :7 समुहसंघटक यांच्या मुदतवाढ देण्यासाठी मा.स्थायी समितीने दिलेल्या आदेशाप्रमाणे संचिका आस्थापना विभागातुन पुटअप होवुन मा.आयुक्तांकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली आहे. तसेच यापुढील मुदतवाढ सन 2004च्या शासन निर्णयानुसार संबधीत विभागाने काढावेत.

मा.सभापती :प्रशासनाने याबाबतीत मा.आयुक्तांकडे फॉलोअप करण्यात यावे. शासन निर्णयानुसार आदेश काढण्यात यावे.

श्री.आगा खान मियॉ खान:वार्डात रोडलगत पत्र्याचे शेड लावुन अनाधिकृत बांधकाम चालु आहे. मोटार लावुन पाणी बांधकामासाठी वापरले जाते. नागरीकांना पिण्यासाठी पाणी

नाही. अनेक वेळा लेखी पत्र दिलेले आहे. परंतु कारवाई होत नाही.

प्रशासकीय अधिकारी :सदर प्रकरणाबाबत माहिती घेऊन जातीने लक्ष देवुन अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती :सुरवातीचे बांधकाम चालु असतांनाच स.सदस्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे. दोन ते तीन मजले बांधकाम झालेले आहे. परंतु कारवाई होत नाही. तरी प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी.

श्री.आगा खान मियॉ खान:रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत 7 कुटूंबाना अजुनही न्याय मिळालेला नाही. इंदिरा आवास घरकुल योजने अंतर्गत घरे देणार म्हणुन घोषणा करण्यात आली होती. सदरील कुटूंबाची परिस्थिती गरीब असुन सध्या ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी दिवा बत्तीचीही सोय नाही. पडदे लावुन राहत आहे. त्यांना तात्काळ घरे देण्यात यावी. वार्डात पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईनचे काम चालु आहे त्या ठिकाणाहुन पायी चालता येत नाही. गुंठेवारी भागात पुर्वी जे काम झालेले आहे ते दुरूस्त करता येते का? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मा.महापौर यांचे समवेत महापौर बंगल्यावर बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळेस गुंठेवारी भागातील कामांच्या दुरूस्तीबाबत सूचना झ ालेल्या आहेत. बजेटचे कामे करू शकतो.

सहा.संचालक न.र. :सर्व स.पदाधिकारी आणि स.नगरसेवक, मा.आयुक्त यांचे समवेत महापौर बंगल्यावर गुंठेवारी विषयी बैठक आयोजित करण्यात आली होती. ज्या ठिकाणी 80 टक्क्यापेक्षा जास्त गुंठेवारी झालेली आहे. रकमेची भरणा केलेली अहे. अशा ठिकाणी त्या रकमेमध्ये ज्या ज्या सुविधा लागतात त्या पुरविल्या जातात एकदा त्या पुरविल्यानंतर त्याची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. असा चर्चेअंती निर्णय झालेला आहे. मिनिटस् काढण्यात आलेले आहे. मा.आयुक्तयांचेकडुन योग्य ते आदेश येतील.

श्री.आगा खान मियॉ खान:माझ्या वार्डात दोन कामे झालेले आहे. अधिकारी यांचेकडून स्वाक्षरी केली जात नाही. अशा वेळेस कंत्राटदार काम कसे करणार.

शहर अभियंता :याबाबतीत स.सदस्यांचे प्रश्न तात्काळ सोडविण्यात येईल.

मा.सभापती :गुंठेवारीबाबत बैठक झालेली आहे. बैठकीचे मिनिटस् वर मा.आयुक्त निर्णय घेतील. जे अंदाजपत्रक झालेले आहे. निवीदेसाठी थांबलेले आहे. निवीदा काढण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :दिनांक 7.09.2012 पर्यंत स्थायी समितीचे इतिवृत्त आलेले आहेत. त्यानंतरचे स्थायी समिती सभांचे इतिवृत्त आलेले नाही. सर्वसाधारण सभेचेही इतिवृत्त मिळत नाही. प्रशासनाकडुन कागद, इतर साहित्य भांडार विभागाकडुन मिळत नाही. भांडार विभागाकडे आलेले साहित्य आणि वापरकेलेले साहित्य यांचे ऑडीट केले जावे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.गिरजाराम हाळनोर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार भांडार विभागाचे ऑडीट लेखापरिक्षक यांनी करावे.

मा.सभापती :विषय क्रमांक 124

श्री.समीर राजुरकर :रमाई योजनेअंतर्गत हर्सुल येथील सर्वे नंबर 216 येथील जागेत 269 चौरस फुट चटाई क्षेत्राचा बहुमजली इमारती असे 512 सदनिका करायचा प्रस्ताव ठेवलेला आहे. रमाई आवास योजनेमध्ये किती रक्कम देतो. तसेच वरील अधिकची रक्कम कोण टाकणार आहे?

**कार्य.अभियंता(बीओटी)** :2 लाख रूपये देण्यात येतात. बजेटमध्ये तरतुद करून यावरील रक्कम मनपाच्या फंडातुन दिली जाणार आहे.

**श्री.समीर राजुरकर** :अलॉटमेंटची प्रक्रीया पारदर्शक असायला हवी.

**कार्य.अभियंता(बीओटी)** :रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांचे सर्वे करून लिस्ट तयार करण्यात आलेली आहे. 269 चौ.फुटाची एक सदनिका देण्यात येणार आहे.

**श्री.समीर राजुरकर** :कैलासनगर येथील या लोकांना सोडुन इतर नागरीक रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत झालेले आहेत त्यासाठी प्रशासनाने कोणती व्यवस्था केलेली आहे. 20 टक्के नागरीक या प्रवर्गात मोडत नाही.

**कार्य.अभियंता(बीओटी)** :सदरील प्रस्ताव हा अनुसूचित जाती आणि नवबौध्द यांच्यासाठी असुन इतरांसाठी हर्सुल येथे प्लाट अलाटमेंट केलेला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :512 सदनिकाचे वाटप अतिशय पारदर्शी असावे. एका व्यक्तीच्या नांवावर एकच सदनिका देण्यात यावी. एकाच घरात समजा पाच सदस्य असतील तर पाच सदस्यांना पाच सदनिकांचे वाटप करण्यात येवु नये.

**कार्य.अभियंता(बीओटी)** :टाउन हॉल ते मकाई गेट येथील जवळपास 80 लोकांचे व आनंदगाडे चौक येथील 79 विस्थापित नागरीकांची यादी तयार केलेली आहे.

**मा.सभापती** :जयभिम नगर येथे मार्कींग करण्यात आलेली आहे. काही नागरीकांचे यादीमध्ये नांव नाही म्हणुन तक्रार आलेल्या आहेत.

**श्री.समीर राजुरकर** :मागच्या वेळेस मा.आयुक्तांसमोर यादीवर आक्षेप घेतला होता. एका घरातील चार सदस्यांचे नांवे यादीमध्ये टाकण्यात आलेली आहे. एकदा यादी फायनल झाल्यावर प्रसिध्द झाल्यावर सदनिकांचे वाटप करावे लागेल. त्यामुळे मा.सभापती यांनी पारदर्शक वाटप करण्यात यावे म्हणुन रूलिंग देण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** :मुकूंदवाडी येथे गणेश उत्सव दरम्यान विहीरीतील गाळ काढतांना तीन व्यक्तींचा मृत्यु झाला होता त्यांनाही सदनिकांचे वाटप करण्यात यावे.

**कार्य.अभियंता(बीओटी)** :समाजकल्याण अधिकारी यांचेकडुन ठराव झालेला आहे. सदरील तीन व्यक्तींचा समावेश यादीमध्ये करण्यात आलेला आहे. सर्वे नंबर 216 मध्ये सदनिका देण्यात येणार आहे.

**श्री.विजेंद्र जाधव** :रस्ता रूंदीकरणामध्ये विस्थापीतांची संख्या किती आहे.

**कार्य.अभियंता(बीओटी)** : एकुण 160 संख्या आहे. तसेच इतर रस्त्यांचे रूंदीकरणाचे काम करावयाचे आहे. सध्या 120 घरे घेण्यात येत आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** : मुंबई येथील फर्म आहे एकुण 512 सदनिका बांधणार आहे. जी घरे घेणार आहेत ती अतिशय गरीब घरचे नागरीक आहेत. रस्ता रूंदीकरणामध्ये घरे गेलेली आहे. संबधीत एजन्सीने 5 वर्षानंतर सदनिका तयार केल्यास त्यास मनपा काय करणार आहे. आजच्या अवस्थेत सदरील नागरीक अतिशय दुरावस्थेत जीवन जगत आहे. वेळेचे बंधन घालण्यात यावे. संबधीतांना किती दिवसात घरे देण्यात येईल ही अट टाकूनच करार करण्यात यावा.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार वेळेवर बांधकाम करण्याचे बंधन करण्यात यावे. बांधकामाची गॅरेंटी घेण्यात यावी. बांधकामाची क्वालिटी महत्वाचा मुद्दा आहे. क्वालिटी उत्तम प्रकारची असावी. महाराष्ट्र राज्यातील हा पहिलाच पायलेट प्रोजेक्ट आहे. करार आणि वर्कऑर्डर आठ दिवसात

करण्यात यावे. केंद्र शासनाचा निधी आहे. कामाची सुरवात लवकरात लवकर करण्यात यावा. 22 कोटी 22 लाख निधी आलेला आहे. 35,000/- च्या तरतुदीसाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी तसा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रशासनाने ठेवावा. यासाठी काम थांबविण्यात येवु नये. मा.महापौर यांना याबाबतीत विनंती करण्यात येईल. प्रशासनाने कार्योत्तर मंजूरी घेऊन काम सुरू करावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :आदरणीय हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे झोपडपट्टीयवासीयांना मोफत घरे देण्याचे स्वप्न होते. शासनाच्या मदतीने महापालिकेच्या वतीने हे स्वप्न साकार होणार आहे. दिनांक 23 जानेवारी रोजी साहेबांचा जन्म दिवस आहे. त्याच दिवशी जागेचे भुमिपुजन करण्यात यावे.

मा.सभापती :दिनांक 23 जानेवारी रोजी भुमिपूजन करू शकतो. दोन याद्या तयार आहे. प्रक्रीया पारदर्शक असायला पाहिजे.

कार्य.अभियंता(बीओटी) :स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांनी व इतर सदस्यांनी केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केल्या जाईल.

मा.सभापती :किती दिवसात काम केले जाईल याची गॅरेंटी तसेच इतर बाबींचे काय नियोजन केलेले आहे.

कार्य.अभियंता(बीओटी) :टेंडरमध्ये नमूद केलेले आहे. वेळेत काम करून घ्यावयाचे आहे संबधीताने मान्य केलेले आहे.

मा.सभापती :काही कारणास्तव काम केले नाही तर प्रशासन काय कार्यवाही करणार.

कार्य.अभियंता(बीओटी) :3,60,000रूपयांची एमडी आहे. बी-2चे सर्व नियम लागु आहे.

<u>विषय क्र. 124 :</u>

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहरातील युध्दपातळीवर चालू असलेल्या शहर विकास आराखडा योजनेनुसार शहर विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे असलेले रस्ता रूंदीकरण मोहिमेत ज्या मिळकतधारकांची मिळकत /घर/ मालमत्ता अंशतः अथवा पुर्णतः बाधीत होत असून ज्यांना राहण्यासाठी जागा नाही अशा अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील नागरीकांचे पुनर्वसन करणे करीता शासनाच्या रमाई आवास योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यातील हर्सुल येथील सर्व्हे नं.216 येथील जागेत प्रत्येकी 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या (Carpet area) विविध बहुमजली इमारतीत एकुण 512 सदनिका बांधणे करीता मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.606 दिनांक 18/02/2012 रोजी मान्यता दिलेली आहे. उपरोक्त ठरावानुसार सदरील कामाअंतर्गत एकुण 4 ब्लॉकसाठी वर्तमानपत्रातून जाहीरात प्रसिध्द करून Expression of interest / दरपत्रके मागविण्यात आलेली होती. ते खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| | रमाई आवास योजना अंतर्गत हर्सुल सर्व्हे नं.216 येथे औरंगाबाद शहर विकास आराखडा योजना सन 2002 नुसार रस्ता रूंदीकरण मोहिमेत बाधीत नागरीक अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी प्रत्येकी 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या (Carpet area) विविध बहुमजली इमारतीत एकुण 512 सदनिका बांधणे.<br>नियोजीत सदनिकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.<br>1. एका विंगमध्ये एकुण 4 ब्लॉक असतील ज्यामध्ये ब्लॉक A,B,C,D प्रस्तावित असुन प्रत्येक ब्लॉकमध्ये एकुण 4 इमारती असतील. | |
| ब्लॉक A मधील | S-1 (G+3) मजली प्रत्येक मजल्यावर 8 सदनिका याप्रमाणे एकुण 32 सदनिका असतील.<br>S-2 (पार्कींग (Stilt)+3) मजली प्रत्येक मजल्यावर 8 प्रमाणे | |

| | | |
|---|---|---|
| | एकुण 24 सदनिका असतील.<br>S-3 (G+3) मजली प्रत्येक मजल्यावर 8 सदनिका याप्रमाणे एकुण 32 सदनिका असतील.<br>S-4 (G+3) मजली प्रत्येक मजल्यावर 8 सदनिका याप्रमाणे एकुण 32 सदनिका असतील.<br>अशाप्रमाणे ब्लॉक A मध्ये एकुण 120 सदनिका असतील त्याची एकुण किमंत 120x2.00 लक्ष | 2.40 कोटी |
| ब्लॉक B मधील | अशाप्रमाणे ब्लॉक B मध्ये एकुण 120 सदनिका असतील त्याची एकुण किंमत 120x2.00 लक्ष | 2.40 कोटी |
| ब्लॉक C मधील | अशाप्रमाणे ब्लॉक C मध्ये एकुण 120 सदनिका असतील त्याची एकुण किंमत 120x2.00 लक्ष | 2.40 कोटी |
| ब्लॉक D मधील | अशाप्रमाणे ब्लॉक D मध्ये एकुण 120 सदनिका असतील त्याची एकुण किंमत 120x2.00 लक्ष | 2.40 कोटी |

**M/s Tap Infrastructure Private Ltd. Mumbai यांचे एकच दरपत्रक प्राप्त झाले असून त्यांनी सदर दरपत्रक फक्त एका ब्लॉकसाठी म्हणजेच 120 सदनिकेकरीता दरपत्रक दाखल केलेले असुन सदर दरपत्रकामध्ये त्यांनी महानगरपालिकेचे अ.प. रक्कम रू.2.40 कोटी ऐवजी रक्कम रू.3.12 कोटी असे दर नमुद केलेले आहे. त्यानुसार त्यांना मा.आयुक्त महोदय यांच्या दालनात दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलविण्यात आले असता दराबाबतच्या वाटाघाटीअंती रू.2.60 लक्ष ऐवजी रू.2.35 लक्ष प्रती सदनिकाप्रमाणे दर अंतिम करून अतिरिक्त रक्कम रू.42.00 लक्षची तरतुद महानगरपालिका फंडातुन करणे आवश्यक असल्याने तरतुद उपलब्ध करून देणेस्तव मा.स्थायी समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.**

**त्यानुसार M/s Tap Infrastructure Private Ltd. Mumbai यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेले दर म्हणजेच रू.2.60 लक्ष प्रति सदनिका ऐवजी रू.2.35 लक्ष प्रती सदनिका या दरानुसार त्यांचेकडून काम करून घेणे बाबतचा प्रस्ताव व सदर घरकुल योजनेस शासनाकडून प्रती घर रक्कम रू.2.00 लक्ष चे अनुदान असून वाढीव रक्कम रू.35000/- प्रती घर प्रमाणे 120 सदनिकेकरीता अतिरिक्त रक्कम रू.42.00 लक्षची तरतुद महानगरपालिका फंडातुन करणे करीता मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.**

**मा.सभापती :विषय क्रमांक 124 मंजूर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील युध्दपातळीवर चालू असलेल्या शहर विकास आराखडा योजनेनुसार शहर विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे असलेले रस्ता रूंदीकरण मोहिमेत ज्या मिळकतधारकांची मिळकत /घर/ मालमत्ता अंशतः अथवा पुर्णतः बाधीत होत असून ज्यांना राहण्यासाठी जागा नाही अशा अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील नागरीकांचे पुनर्वसन करणे करीता शासनाच्या रमाई आवास योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यातील हर्सुल येथील सर्व्हे नं.216 येथील जागेत प्रत्येकी 269 चौ. फुट चटई क्षेत्राच्या (Carpet area) विविध बहुमजली इमारतीत एकुण 512 सदनिका बांधणे करीता प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार M/s Tap Infrastructure Private Ltd. Mumbai यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे रू.2.60 लक्ष प्रति सदनिका ऐवजी रू.2.35 लक्ष प्रती सदनिका या दरानुसार त्यांचेकडून काम करून घेणेस व सदर घरकुल योजनेस शासनाकडून प्रती घर रक्कम रू.2.00 लक्ष चे प्राप्त झालेले अनुदान आणि वाढीव रक्कम रू.35000/- प्रती घर प्रमाणे 120 सदनिकेकरीता अतिरिक्त रक्कम रू.42.00 लक्षची तरतुद महानगरपालिका फंडातुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदर प्रस्ताव पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 125 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड ब अंतर्गत येणाऱ्या एकुण 17 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम /म. जी. प्रा. खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार महानगरपालिकेने रक्कम रु. 2,90,58,121/- चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभेने दि. 18/10/2012 रोजी ठराव क्र. 955 नुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. डांबरीकरणांच्या कामात सुसूत्रता व कामाचे नियोजन योग्य रित्या होऊन काम वेळेवर होण्याकरिता B-2 फार्ममध्ये (Item Rate) करण्याची मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत- 02 निविदा प्राप्त झाल्या दिलेल्या बाब निहाय दराची गणीती प्रमाणे त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या खालील प्रमाणे येत आहे.

**1. मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 2,90,64,902.43/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 3,37,79,229/-**

**2. श्री. के. बी. पाथ्रीकर** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 2,90,64,902.43/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 3,48,05,220/-**

**दोन्ही पैकी मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त बाब निहाय निविदा दर हे एल-1 (L-1) असुन अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा जास्तीचे येत असल्याने प्राप्त दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानूसार शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व तांत्रिक कक्षप्रमुख यांनी एकत्रितपणे संबंधीत गुत्तेदारासोबत प्रत्यक्ष दर वाटाघाटी केली असता संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये 6.23 % दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार नमुद कामावर अपेक्षित खर्च र.रू.3,19,68,486/- होणार आहे. त्यानुसार मा.आयुक्त, यांनी यास मान्यता दिली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.**

**करिता नमुद काम बाब निहाय दरात 6.23% दराची सुट / Rebate सह मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे कडुन करुन घेणेच्या B - 2 फार्म बाब निहाय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती :विषय क्रमांक 125 ते 131 मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड ब अंतर्गत येणाऱ्या एकुण 17 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी B-2 फार्ममध्ये (Item Rate) ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविल्यानुसार प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये बाबनिहाय दरात 6.23% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार सदरील काम मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यास व या कामावर अपेक्षित रक्कम रू.3,19,68,486/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 126 :**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क अंतर्गत येणाऱ्या प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या चालु वर्षाच्या अर्थ संकल्प 2012 - 2013 मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम / म. जी. प्रा. खात्याच्या सन 2011 - 2012 च्या जिल्हा दरसुचीनुसार महानगरपालिकेने रक्कम रु. 2,06,07,220/- चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभेने दि. 18/10/2012 रोजी ठराव क्र. 956 नुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. डांबरीकरणांच्या कामात सुसूत्रता व कामाचे नियोजन योग्य रित्या होऊन काम वेळेवर होण्याकरिता B-2 फार्ममध्ये (Item Rate) करण्याची मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत- 02 निविदा प्राप्त झाल्या दिलेल्या बाब निहाय दराची गणीती प्रमाणे त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या खालील प्रमाणे येत आहे.**

**1. श्री. राजेंद्रसिंग डी. अजितसिंग** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 2,06,07,130/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 2,41,16,524/-**

**2. श्री. एम. ए. सिद्दीकी** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 2,06,07,130/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम**

**रू. 2,49,03,716/-**

दोन्ही पैकी श्री. राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांचे प्राप्त बाब निहाय निविदा दर हे एल-1 (L-1) असून अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा जास्तीचे येत असल्याने प्राप्त दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानूसार शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व तांत्रिक कक्षप्रमुख यांनी एकत्रितपणे संबंधीत गुत्तेदारासोबत प्रत्यक्ष दर वाटाघाटी केली असता संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये 7.28 % दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार नमुद कामावर अपेक्षित खर्च र.रू.2,26,16,325/- होणार आहे. त्यानुसार मा.आयुक्त, यांनी यास मान्यता दिली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.

करिता नमुद काम बाब निहाय दरात 7.28% दराची सुट / Rebate सह श्री.राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांचे कडुन करुन घेणेच्या B-2 फार्म बाब निहाय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क अंतर्गत येणाऱ्या प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी B-2 फार्ममध्ये (Item Rate) ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविल्यानुसार प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये बाबनिहाय दरात 7.28% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार सदरील काम श्री.राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांचेकडून करून घेण्यास व या कामावर अपेक्षित रक्कम रू.2,26,16,325/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 127 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.15 एन-12 येथील छाया तेल भांडार ते डी-सेक्टर, कम्युनिटी सेंटर रस्त्याचे Tre-Mix Concrete करणे तसेच रोड साईडला पेव्हर ब्लॉक बसविणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.32,94,000/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2012-13 या आर्थिक वर्षात नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे. तरी र.रू.32,94,000/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.15 एन-12 येथील छाया तेल भांडार ते डी-सेक्टर, कम्युनिटी सेंटर रस्त्याचे Tre-Mix Concrete करणे तसेच रोड साईडला पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.32,94,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 128 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र.33 गुलमंडी अंतर्गत दिवान देवडी व इतर भागात रस्त्यांसाठी कॉक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा. /सा.बां. खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,90,000/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून देण्यात आली आहे. सदरील कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पातील नविन कॉक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र. GBR-

**Ward-D New Work-26 अ.क्र.09 वर उपलब्ध रक्कम रू.30.00 लक्ष अंतर्गत प्रस्तावित आहे.**

**करिता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.29,90,000/- अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.33 गुलमंडी अंतर्गत दिवान देवडी व इतर भागात रस्त्यांसाठी कॉक्रीटींग करणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,90,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 129 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला गुलमंडी येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील भोलेश्वर मार्केट व्यापारी संकुलातील दुकान क्र. (01) संबंधाने अर्जदार श्री.नितीन भा. वाहुळ यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 10.5 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान रिक्त आहे. सदर गाळयांचे मासिक भाडे शीघ्र गणकाआधारे रू.3,100/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता अर्जदार श्री.नितीन वाहुळ यांचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.3,100/- प्रतिमाह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला गुलमंडी येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील भोलेश्वर मार्केट व्यापारी संकुलातील रिक्त असलेले दुकान क्र. (01) क्षेत्र 10.5 चौ.मी. श्री.नितीन भा. वाहुळ यांनी मागणी केल्यानुसार सदर दुकान त्यांना मासिक भाडे रू.3,100/- आकारणी करून देण्यास व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 130 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील पिया मार्केट व्यापारी संकुलातील (तळ मजला) दुकान क्र.(31) संबंधाने अर्जदार श्री.मोहमंद रइसोद्दीन शुजाउद्दीन यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 7.2 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान रिक्त आहे. सदर गाळयांचे मासिक भाडे शीघ्र गणकाआधारे रू.2,300/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता अर्जदार श्री.मोहमंद रइसोद्दीन शुजाउद्दीन यांचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.2,300/- प्रतिमाह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील पिया मार्केट व्यापारी संकुलातील (तळ मजला) रिक्त असलेले दुकान क्र.(31) क्षेत्र 7.2 चौ.मी. श्री.मोहमंद रइसोद्दीन शुजाउद्दीन यांनी मागणी केल्यानुसार सदर दुकान त्यांना मासिक भाडे रू.2,300/- आकारणी करून देण्यास व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 131 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील पिया मार्केट व्यापारी संकुलातील (तळ मजला) दुकान क्र.(30) संबंधाने अर्जदार श्री.मो.फराद खान पि.मो. यासीन खान यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 7.2 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान यापूर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने

**ताब्यात घेतली नसल्याने सदर दुकान रिक्त आहे. सदर गाळयांचे मासिक भाडे शीघ्र गणकाआधारे रू.2,300/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता अर्जदार श्री.मो.फराद खान पि.मो. यासीन खान यांचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.2,300/- प्रतिमाह निश्चित करून तीन वर्षासाठी नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला औरंगपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील पिया मार्केट व्यापारी संकुलातील (तळ मजला) रिक्त असलेले दुकान क्र.(30) क्षेत्र 7.2 चौ.मी. श्री.मो.फराद खान पि.मो. यासीन खान यांनी मागणी केल्यानुसार सदर दुकान त्यांना प्रतिमाह भाडे रू.2,300/- आकारणी करून देण्यास व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**